FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): कोल्हापुर **P.S.**(ठाणे): हातकणंगले
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0326 **Year** (वर्ष): 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):28/07/2026 17:20

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	125(a)
2	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	125(b)
3	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	281
4	मोटरवाहन अधिनियम, १९८८	184

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): गुरूवार **Date From** (दिंनाक पासून): 12/02/2026
Time Period (कालावधी): पहर 4 **Date To** (दिंनाक पर्यंत): 12/02/2026
Time From (वेळेपासून): 11:20 बजे
Time To (वेळेपर्यंत): 11:25 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिंनाक): 19/02/2026 **Time** (वेळ): 13:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):
Entry No. (नोंद क्र.): 022
Date & Time (दिंनाक आणि वेळ): 28/07/2026 16:22 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 1.5 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): कोल्हापुर ते सांगली जाणारे रोड,हिंदुस्थान पेट्रोल पंप समोर, हातकणंगले,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): SAGAR VISHWAS PATIL

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 31/07/1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	KOLHAPUR,इचलकरंजी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	KOLHAPUR,इचलकरंजी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	विक्रम हिंदुराव पाटील		वडील का नाम : हिंदुराव पाटील	1. रेणुका मंदीर जवळ,कसबा बावडा कोल्हापुर,करवीर, हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	**UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्यादी जबाबदारी दिनाक 28/07/2026

मी सागर विश्वास पाटील पोलीस हेड कॉन्स्टेबल बक्कल नंबर 457 नेमणुक हातकणंगले पोलीस ठाणे सक्षम पोलीस ठाणेत हजर राहुन देतो फिर्यादी जबाब असा की,

मी हातकणंगले पोलीस ठाणेस सन 2023 पासुन पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन नेमणुकीस असुन दिनाक 19/02/2026 रोजी प्राप्त अपघात दवाखाना वर्दीनुसार हातकणंगले पोलीस ठाणे तात्कालीन पोलीस निरीक्षक श्री. मेमाणे सा◌ो यांनी दिले मुखशील आदेशावरुन ठाणे अंमलदार पोहेकॉ 1023 बावणे यांनी हातकणंगले पोलीस ठाणे मोटर अपघात रजिस्टर नंबर 01/2026 प्रमाणे दाखल करुन नमुद मोटर अपघाताची चौकशी आमचेकडे दिली असता त्यातील वर्दीदार यांचा वर्दीजबाब, अँस्टर आधार हॉस्पीटल कोल्हापुर यांचेडील एलएलसी, राजारामपुरी पोलीस ठाणे पोहेकॉ 07 मिलींद मालाई यांचा रिपोर्ट अशी कागदपत्रे असुन नमुद अपघाताची थोडक्यात हकीकत अशी की, दिनाक 12/02/2026 रोजी सकाळी 11.00 वा.चे सुमारास यातील वर्दीदार हे आपले ताब्यातील ज्युपिटर कंपनीची मोपेड नंबर MH/09/FK/8636 हे वाहन घेवुन कोल्हापुर ते सांगली जाणारे राज्यमार्गावरुन हातकणंगले गावचे हद्दीतील तारदाळ फाटा क्रॉस करुन हिंदुस्थान पेट्रोलपंपाकडे वळत असताना पाठीमागुन येणारे येझडी कंपनीची अँडव्हेनचर मोटरसायकल नंबर MH/09/HB/7934 वरील मोटरसायकस्वार यांने त्यांचे मोपेडला पाठीमागुन जोरात धडक दिलेने अपघात झालेला असुन झाले अपघातामध्ये वर्दीदार यांचे खुब्याचे हाडास मार लागुन अस्थिंभग झालेने त्यांना पुढील उपचाराकरीता अँस्टर आधार हॉस्पीटल कोल्हापुर येथे दाखल करणेत आलेले होते. सदर ठिकाणी उपचार सुरु असताना अँस्टर आधार हॉस्पीटल मार्फत दिले दवाखाना वर्दीनुसार राजारामपुरी पोलीस ठाणेकडील पोहेकॉ मिलींद जोतीबा मालाई ब.नं.07यांनी जखमीचा जबाब घेतलेला असुन सदरचा जवाब, दवाखाना वर्दी, रिपोर्टासह प्राप्त झालेने वर नमुद प्रमाणे मोटर अपघात दाखल करणेत आलेला असुन नमुद मोटर अपघाताची सविस्तर चौकशी आम्ही स्वतः केलेली आहे.

नमुद अपघाताचे चौकशामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नामे सुदर्शन दिलीप पाटोळे रा. गणेशनगर, तारदाळ फाटा, हातकणंगले यांचे माहितीने अपघात घडले ठिकाणचा पंचनामा दोन पंचासमक्ष करणेत आलेला असुन सदरचे ठिकाण हे कोल्हापुर ते सांगली जाणारे राज्यमार्ग क्रमांक 166 वर असुन तारदाळ फाटयालगत असले हिदुस्थान पेट्रोलपंपा समोर असले रस्ता दुभाजकाजवळ आहे. सदर ठिकाणी सुमारे 100 फुटाचा डांबरी रस्ता असुन रोडच्या मध्यभागी दुभाजक आहेत. तसेच हिंदुस्थान पेट्रोलपंपाकडे जाणेसाठी रोडमधील काही दुभाजक काढणेत आलेले आहेत. सदरचा रस्ता हा रहदारीचा असुन अक्षा 16.756727 रेखांक्ष 74.433683असा आहे. नमुद पंचनामा मुळ कामात सामील करणेत आलेला आहे. त्यानंतर पंचनामा साक्षीदार यांचेकडे अपघाताचे अनुषंगाने चौकशी करता दिनाक 12/02/2026 रोजी सकाळी 11.00 वा.चे सुमारास अपघात घडले ठिकाणी रोडचे कडेला असले आपले मालकीचे मिल्स ऑन व्हील या नाष्टा सेंटर येथे हजर होते. त्यांचे थोडक्यात सांगणे की, वर्दीदार हे आपले ज्युपिटर मोपेडवरुन उजवीकडे वळत असताना भरधाव वेगाने येणारे मोटरसायकलची धडक पाठीमागुन मोपेडला बसुन अपघात झालेला असुन अपघातानंतर मी तसेच जमलेल्या लोकांनी अपघातातील वाहने रोडच्या बाजुला घेवुन जखमी इसम यास खाजगी वाहनामध्ये बसवुन उपचाराकरीता पाठविलेले असुन नमुद अपघातामध्ये पाठीमागुन धडक मारणारे मोटरसायकलस्वार याचीच चुक असलेचे सांगत आहे. तसा त्याचा जबाब नोंदवुन मुळ कामात सामील करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे मा. वैदयकीय अधिकारी अँस्टर आधार हॉस्पीटल कोल्हापुर याना इकडील पोलीस ठाणे जावक क्रमांक 1952/2026 दिनाक 19/02/2026 अन्वये अपघातातील जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत रिपोर्ट सादर केलेला असुन त्याचेवर त्यांनी दिनाक 23/02/2026 रोजी प्रमाणपत्र दिले की, वर्दीदार नामे उदय महादेवराव मंडलिक वय 37 वर्षे रा. कोल्हापुर यांना Right Acetabulum Fracture (Anterior+Posterior Wall) Nature Of Injury Grievous अशी झाले अपघातामध्ये गंभीर दुखापत

झालेली आहे.
त्यानंतर यातील वर्दीदार उदय महादेवराव मंडलिक यांचेकडे सविस्तर चौकशी करता त्यांचे सांगणे की, माझेकडे वाहन चालविणेचा परवाना असुन त्यांचा क्रमांक एमएच 0920080006906 असा आहे. त्यांची मुदत 26 मार्च 2028 पर्यंत असुन त्यावर एलएमव्ही एमसीडब्ल्युजी वाहन चालविणेबाबत नमुद आहे. दिंनाक 12/02/2026 रोजी मी व माझा मित्र विठ्ठल शिवाजी राऊळ असे संग्राम घोरपडे यांचे मालकीची ज्युपिटर मोपेड क्रमांक MH/09/FK/8636 घेवुन सकाळी 10.30 वा.चे सुमारास कोल्हापुर येथुन जयसिंगपुर येथे कामानिमित्त निघालो. जात असताना मोपेड मीच चालवत होतो. साधारण 11.20 वा.चे सुमारास हातकणंगले एस.टी. स्टॅण्ड पास करुन तारदाळ फाट्यापासुन पुढे आलो असता आमचा आणखीन एक मित्र संदीप चौधरी हा तारदाळ फाट्यावर येणार असलेने मी परत तारदाळ फाटयावर जाणेकरीता हिंदुस्थान पेट्रोल पंपासमोर असले डिव्हायडर मधुन रोड दिसलेने मी पाठीमागे वळुन पाहिले असता कोणतेही वाहन येत नसलेची खात्री करुन उजवे बाजुस वळणार असलेने उजवे बाजुचा इंडीकेटर सुरु केला व पाठीमागे बसलेल्या माझा मित्र विठ्ठल यांने हात दाखविला. त्यानंतर मी ज्युपिटर मोपेड उजवीकडे वळवत असताना अचानक एक मोटरसायकल स्वार भरधाव वेगाने मोपेडच्या पाठीमागील उजवे बाजुचे इंडीकेटर जवळ जोरात धडकला त्यावेळी माझा मोपेडवरील ताबा सुटला व खाली पडलो माझा मित्र विठ्ठल बाजुला पडला. धडक देणारा मोटरसायकल स्वार हा सुध्दा खाली पडलेला होता. घडले अपघातामुळे लोकांच गर्दी जमली जमलेल्या लोकांनी मोटरसायकल बाजुला घेवुन मला उचलुन डिव्हायडर वर बसवले त्यावेळी माझे उजवे पायात खुप वेदना होत असलेने मी स्वतः उठणेचा प्रयत्न केला परंतु मला उभे राहता येत नव्हते तेव्हा मी माझा मोबाईल शोधणेचा प्रयत्न केला असता माझा मोबाईल मला धडक देणारे इसमांचे हातात दिसला त्यावेळी मी त्यास मोबाईल माझेकडे दया घरी फोन करतो असे सांगितले असता त्यांनी मोबाईल परत न करता मला अरेरावीची भाषा वापरुन पासवर्ड मागु लागला. त्यानंतर त्यांने आपले मोबाईलवर कॉल करुन माझा नंबर घेतला त्यानंतर मला समजले की, त्यांचे नाव विक्रम पाटील आहे. त्यानंतर माझे मित्र संदीप चौधरी यांना कॉल करुन बोलावुन घेतले. विठ्ठल यास किरकोळ मार लागलेला असलेने तो गाडीत जावुन बसला मित्र संदीप चौधरी व जमलेल्या लोकांनी मला उठता येत असलेने उचलुन संदीप यांचे गाडीत बसवले. मी गाडी बसलेनंतर संदीप यांने मला धडक मारणारे मोटरसायकल स्वार यांचे मोटरसायकलचे फोटो दाखविले सदरची मोटरसायकल येझडी कंपनीची अँडव्हेनचर तिचा नंबर MH/09/HB/7934 असे असलेचे समजले. त्यानंतर मी नातेवाईकांना घडले अपघाताबाबत माहीती देवुन उपचारा करीता अँस्टर आधार हॉस्पीटल येथे दाखल झालो. तेव्हा डॉक्टरांनी मला तपासुन एक्स-रे काढुन माझे उजवे बाजुचे खुब्याचे हाड फॅक्चर झालेचे सांगितले तसेच पुणे येथुन डॉक्टर बोलावुन शस्त्र क्रिया करावी लागेल असे सांगितले. त्यानंतर माझेवर शस्त्रक्रिया गुंतागुंतीची असलेने दिंनाक 17/02/2026 रोजी पुणे येथुन सर्जन उपलब्ध झालेवर शस्त्रक्रिया करणेत आलेली आहे.

तरी दिंनाक 12/02/2026 रोजी मी व माझा मित्र विठ्ठल राऊळ असे ज्युपिटर मोपेड क्रमांक MH/09/FK/8636 वरुन कामानिमीत्त जयसिंगपुरकडे जात असताना इसम नामे विक्रम पो◌ाटील यांने त्यांचे ताब्यातील येझडी मोटरसायकल क्रमांक MH/09/HB/7934 भरधाव वेगाने चालवुन मी चालवत असले मोपेडला पाठीमागुन जोरात धडक मारुन अपघात केलेला असुन झाले अपघातामध्ये माझी उजवे बाजुचे खुब्याचे हाड फॅक्चर झालेले आहे. माझा मित्र विठ्ठल राऊळ यास किरकोळ मुका मार लागलेला आहे. झाले अपघातामध्ये विक्रम पाटील यांने पाठीमागुन धडक मारुन अपघात केलेला असताना सुध्दा त्यांने आम्हास सहकार्य न करता माझा मोबाईल घेवुन अरेरावीची भाषा वापरुन धमकावले आहे. नमुदप्रमाणे अपघाताचे चौकशीकामी अँस्टर आधार हॉस्पीटल येथे जबाब नोंदवुन त्यावर वैदयकीय अधिकारी यांची सही शिक्का घेवुन जबाब मुळ कामात सामील करणेत आलेला आहे.

नमुद मोटर अपघातातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नामे विठ्ठल शिवाजी राऊळ यांचे सांगणे की, दिंनाक 12/02/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता माझे मित्र उदय मंडलिक यांचेबरोबर जयसिंगपुर येथे जाणेकरीता ज्युपिटर मोपेड क्रमांक MH/09/FK/8636 वरुन निघालो. जात असताना मोपेड उदय मंडलिक चालवत होता तसेच मी पाठीमागील सीटवर बसलेलो होतो. साधारण 11.20 वा. चे सुमारास आम्ही तारदाळ फाटा पास करुन पुढे जात असताना आमचा मित्र संदीप चौधरी तारदाळ फाटयावर येणार असलेने आम्ही परत तारदाळ फाटा येथे जाणेकरीता हिंदुस्थान पेट्रोलपंप येथुन उजवीकडे वळण घेत असताना उदय यांने मोपेडचा इंडीकेटर सुरु केला होता. तसेच मी पाठीमागुन येणारे वाहनाना थांबिवणेकरीता हात दाखविला होता. त्यानंतरही उजवीकडे वळण घेत असताना पाठीमागुन एक मोटरसायकल आमचे मोपेडला जोरात धडकली त्यावेळी मी व उदय असे मोटरसायकलवरुन खाली पडलो. धडक मारणारा मोटरसायकल स्वारही खाली पडला. झाले अपघातानंतर मी व मोटरसायकल स्वार असे ऊठुन जमलेल्या लोकांच्या मदतीने गाडया बाजुला घेवुन उदय यास उचलन बाजुला घेतले. उदय यांचे उजवे पायास खुप दुखत असलेने त्याने मोबाईल वरुन संदीप यास फोन करणेसाठी फोन शोधत

असताना उदय यांचा मोबाईल धडक देणारे मोटरसायकल स्वार यांचे हातात दिसला तेव्हा उदय यांने मोबाईल परत दे असे म्हणता नमुद मोटरसायकल स्वार पासवर्ड सांग असे म्हणून उदय यास मोठमोठ्याने ओरडुन अरेरावीची भाषा वापरु लागला तेव्हा मी व जमलेल्या लोकांनी त्यास मोबाईल परत देणेबाबत सांगितले तरीपण त्याने उदय जवळ जावुन पासवर्ड मागत असताना उदय यांने फोन घेवुन संदीप यास फोन केला त्यानंतर धडक देणारे मोटरसायकल सवार यांने उदय यांचा मोबाइल घेवुन त्यावर त्याचा नंबर डायल केला त्यावेळी त्यांचे नाव विक्रम पाटील असे असलेचे समजले.

थोडया वेळांनी संदीप चारचाकी वाहनासह तिथे आलेवर मी गाडीत जावुन बसलो उदय यास उठता येत नसलेने संदीप व जमलेल्या लोकांनी उदय यास गाडीत उचलुन बसविले त्यावेळी पोलीस गाडी आली व पोलीसांनी हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगितले. तरी दिंनाक 12/02/2026 रोजी सकाळी 11.20 वा.चे सुमारास हातकणंगले येथे तारदाळ फाटयाच्या पुढे हिंदुस्थान पेट्रोलपंपाचे समोर इसम नामे विक्रम पाटील यांने त्यांचे ताब्यातील येझडी अँडव्हेनचर मोटरसायकल नंबर MH/09/HB/7934 ही भरधाव वेगाने चालवुन आमचे ज्युपिटर मोपेड नंबर MH/09/FK/8636 हिस पाठीमागुन जोरात धडक मारुन अपघात केलेला असुन झाले अपघातामध्ये मोपेड चालविणारा माझा मित्र उदय महादेवराव मंडलिक यांचे उजवे बाजुचे खुब्याचे हाड मोडलेले आहे. त्याचेवर अँस्टर आधार हॉस्पीटल कोल्हापुर येथे उपचार सुरु असुन दिंनाक 17/02/2026रोजी शस्त्रक्रिया केलेली आहे. नमुदप्रमाणे अपघाताचे चौकशीकामी जबाब नोंदवुन सदरचा जबाब मुळ कामात सामील करणेत आलेला आहे. नमुद अपघातातील पाठीमागुन धडक मारणारा येझडी अँडव्हेनचर मोटरसायकल नंबर MH/ 09/HB/ 7934 वरील मोटरसायकल स्वार हा पोलीस कॉन्स्टेबल असुन सध्या तो हातकणंगले पोलीस ठाणेस नेमणुकीस आहे. नमुद अपघाताचे चौकशीकामी त्यांचा जबाब नोंदविला असता त्यांचे सांगणे की, हिंदुराव पाटील वय वर्षे 32 व्यवसाय नोकरी रा. रेणुका मंदीर समोर रेणुका नगर कसबा बावडा कोल्हापुर मोबाईल नंबर 9595833838 समक्ष पोलीस ठाणेत हजर राहुन देतो जबाब असा की,

मी वरील पत्यावर माझे कुटुंबासह राहणेस असुन मी कोल्हापुर जिल्हा पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल या पदावर सन 2014 पासुन नोकरीस असुन सध्या जुन 2025 पासुन हातकणंगले पोलीस ठाणेस कर्तव्यार्थ नेमणुकीस आहे. माझेकडे वाहन चालविणेचा परवाना असुन त्याचा क्रमांक एमएच/09/20110036951 असा आहे. वाहन परवान्याची मुदत दिंनाक 23/06/2031 पर्यंत असुन त्यावर कार व मोटरसायकल वाहन परवाना असे नमुद आहे..... पुढील जबाब एफ. आय.आर. सोबत जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

SUHASINI LAXMAN JADHAV

Rank (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): PSMH27264

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची सहीअक्षरी)

Name (नाव): SACHIN HINDURAO
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
हातकणंगले

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):